श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---

# परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा

श्रीनिवास हेमाडे

- एक -



लेखकाचे लिहिणे हा मुद्दा आला की लेखक काय करतो, याची अखंड चर्चा सुरु होते. त्यावर मग उदंड लेखनही होत राहाते. चर्चा ठेवली किंवा/आणि ती झाली चर्चा की ऐकणारे श्रोते तयार होतात आणि लेखन झाले की वाचणारे वाचक तयार होतात. वाचकातून पुन्हा लेखक होण्याची शक्यता नाकारता येत नाहीच. म्हणजे मुळात एखाद्याला लिहावेसे वाटले आणि त्याने लिहिले की तो लेखक होतो. ते वाचून एखाद्याला 'मीही लिहितो' अशी प्रेरणा झाली की तोही लेखक होतो.

पुढे जाण्यापूर्वी मी इथे एक खुलासा करतो. तो मुद्दा अर्थातच बहुतेक सर्वांना माहित असतो, असे गृहीत धरण्यात येते. पण संदिग्धता टाळण्यासाठी त्याविषयी अधिक खुलासा.

माणूस म्हणजे कोण? याचे उत्तर फार खोलात जाऊन शोधण्यापेक्षा मी सरळपणे हे सांगू इच्छितो की माणूस म्हणजे वास्तवातील स्त्री आणि पुरुष हे दोघे. माणूस म्हणजे केवळ पुरुष असे नाही.

इथे लक्षात घेणे आवश्यक आहे की 'माणूस' ही संकल्पना आहे आणि ती 'स्त्री' आणि 'पुरुष' या दोन इतर संकल्पनांनी बनली आहे. या संकल्पनांमध्ये फरक (distinguish) करता येतो आणि केला पाहिजे. एवढेच नव्हे तर या संकल्पना अलग (separate) करता येण्याजोगेही आहेत. किंबहुना आपण वास्तवात तेच करीत असतो. जीवन व्यवहारात स्त्री हा माणूस वेगळा आणि पुरुष हा माणूस वेगळा असतो. इथे स्त्री व पुरुष या संकल्पनांचा विस्तार केला पाहिजे. या संकल्पनातून व्यक्त होणाऱ्या, त्यातून तयार होणाऱ्या, त्यात गुंतलेल्या इतर संकल्पना खुल्या केल्या पाहिजेत.

स्त्रीच्या शरीरात स्त्रीचे मन असते आणि पुरुषाच्या शरीरात पुरुषाचे मन असते, अशी साधारणतः आपली जीवशास्त्रीय श्रद्धा असते. लिंगानुसारी मनोरचना हा माणूस असण्याचा आधार असतो. इथे एक पेच आहे. तो असा की, -

*शरीर स्त्रीचे आहे पण मन पुरुषाचे आहे तर असा माणूस म्हणजे नेमका कोणता माणूस ?*

किंवा

*शरीर पुरुषाचे आहे पण मन स्त्रीचे आहे तर असा माणूस म्हणजे नेमका कोणता माणूस ?*

काही पर्याय आहेत. मन आणि शरीर यांचे नाते समसमान असेल किंवा नसेल. शरीर स्त्रीचे असेल आणि मनही स्त्रीचे असेल. शरीर पुरुषाचे असेल आणि मनही पुरुषाचे असेल; किंवा शरीर स्त्रीचे पण मन पुरुषाचे अथवा शरीर पुरुषाचे पण स्त्रीचे असेल. 'असा माणूस जे होणे' अनुभवेल तसे त्याचे आविष्करण होईल. ते त्याचे लेखन असेल. या लेखनाचे स्वरूप गद्य, पद्य, ललित इत्यादी काहीही असेल. ते त्याचे असेल.

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---



या पर्यायामधून शरीर मानवाचे आहे आणि मन ईश्वराचे आहे; किंबहुना शरीर माणसाचे आणि आत ईश्वर, आत्मा असे काही प्रस्तुत लेखाच्या परिघात अपेक्षित नाही. उदाहरणार्थ धार्मिक समजली जाणारी पुस्तके- जसे की श्रीमद्भगवतगीता, पण कुराण अथवा बायबल इथे अपेक्षित नाही नाही. गीता खुद्द *श्रीकृष्णाच्या* रुपात ईश्वराने कथन केली, असे गृहीत आहे. कुराण, बायबल, अवेस्ता हे ईश्वराने आदेश देऊन *माणसाकडून* लिहवून घेतलेले आहेत. त्यामुळे अवतार इत्यादी दैवी पर्याय आणि त्यांचे लेखन प्रस्तुत विवेचनकक्षेत आणता येत नाही.

भारतीय वैदिक संस्कृतीतीत तर लेखक नाही पण लेखन आहे, असा अद्‌भुतरम्य लेखनप्रकार आहे. त्यातील रम्यता हा भाग वगळला तर अद्‌भुत ही संकल्पना लागू होऊ शकत नाही, अशा रितीचे साहित्य भारतीय परंपरेत निर्माण झाले आहे. ते म्हणजे वेदवाङ्मय.

'वेद' हे लेखन आहे; पण त्याचे लेखक कुणीही नाही(त). वेद अपौरुषेय आहे ! ते कुणाही पुरुषाने लिहिलेले नाही, असे गृहीत धरलेले आहे. येथे 'पुरुष' म्हणजे आत्मा जिथे राहातो ते शरीर, असा अर्थ आहे. म्हणजे कोणताही माणूस. स्त्री किंवा पुरुष असा लिंगानुसार माणूस नव्हे. त्यात पुन्हा आत्म्याचे वसतीस्थान असणारे हे शरीर 'हिंदू' धर्माच्या कोंदणात जन्मलेले असले पाहिजे; ते इतर धर्मीय असून चालणार नाही. अशा कोणत्याही पुरुषाने न लिहिलेले पण विश्वाच्या (ब्रह्मांडाच्या) अस्तित्वात येण्याआधीच अस्तित्वात असलेले हे वेदवाङ्मय आहे. साहित्यातील लघुकथा ते महाकाव्य इत्यादी बहुतेक सारे प्रकार वेदवाङ्मयात उपलब्ध आहेत. त्यात श्रुति आणि स्मृति असे प्रकार आहेत. त्यातील मुख्यतः श्रुतिवाङ्मय अपौरुषेय आहे तर स्मृतिवाङ्मय पौरुषेय आहे. मनुस्मृती इत्यादी पौरुषेय तर पुरुषसूक्त अपौरुषेय आहे.

आता, विरोधाभास असा की 'अद्‌भुत' ही कसोटी वेदवाङ्मयास लागू होऊ शकत नाही, कारण 'भूत' ही कालदर्शक संकल्पना आहे. 'अद्‌भुत' म्हणजे 'असे यापूर्वी भूतकाळात घडलेले नाही.' पुढे जावून ' भविष्यकाळात असे घडणार नाही, असे गृहीत असते. वेदवाङ्मय काळाच्या आणि स्थळाच्या चौकटीत निर्माण झालेले नाही. मूलतः ते ब्रह्मांडाच्या निर्मितीपूर्वीपासून असल्याने ते भूतकालीन तर नाहीच पण समकालीन असण्याचा प्रश्नही निकालात निघतो !

वेदवाङ्मयाच्या आधारे विकसित झालेले संतसाहित्य हे सुद्धा असेच अद्‌भुतरम्य लेखन आहे. विशेषतः अद्वैत वेदान्तावर आधारलेले संतसाहित्य. वर्णजातिव्यवस्थेची चौकट स्वीकारलेले संतसाहित्य समकालीन कसे असू शकेल, याचा विचार करणेही बऱ्याचदा परंपरेच्या दडपणामुळे नाकारले जाते. संत साहित्याची समीक्षा, त्याचे पुनरावलोकन, पुनर्विवरण, तसेच स्थलकालनिरपेक्ष असे काही तत्त्व सापडलेच तर ते लेखन समकालीन असू शकते. म्हणून तसे चिकित्सक लेखन करणारे लेखकही समकालीन असू शकतात.

या अद्‌भुतरम्य लेखनातून समकालीन असे काही खणून काढता येत नसले तरी अनेकजणांना त्यातील अनेक गोष्टी समकालीन वाटत राहातात. त्याचा परिणाम म्हणून जे लेखनकर्म करतात, ते समकालीन असल्याची दवंडी पिटवली जाते. हे लेखक त्यांचे कर्मफळही (अमुकतमुक पुरस्कार, समित्या इत्यादी) न्जॉय करणारे लेखक असतात. या लेखकांचे आणि त्यांच्या चिरकालीन लेखनाचे *अस्तित्वात* असणे, ही घटना इतरांच्या समकालीन असते ; पण या लेखकांचे *लेखन* समकालीन नसते म्हणून ते *लेखकही समकालीन नसतात.*

समकालीनतेचा दर्जा अद्वैतवेदान्ताला जसा देता येत नाही , तसा पाश्चात्य परंपरेत प्लेटोच्या साहित्यालाही देता येत नाही. प्लेटोचे चिंतन अमर असले तरी (किंबहुना अमर असते म्हणूनही) समकालीन नसते. समकालीन

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---

ही बदलती संकल्पना आहे आणि जे काही अमर असते ते कधीही बदलते नसते, ते कालातीत असते. प्लेटोचा अथवा अद्वैतवेदान्ताचा चिद्वाद हा काही समकालीन असू शकत नाहीत. अर्थात, त्यातील काही संकल्पना कोणत्याही काळात उपयुक्त असू शकतात. जसे की प्लेटोने सॉक्रेटीसच्या तोंडी घातलेले 'परीक्षण न केलेले जीवन जगण्यास व्यर्थ आहे.' पण 'ज्ञान' ही संकल्पना कोणत्याही काळात समकालीन असू शकत नाही.

थोडक्यात, लेखन ईश्वरी आहे, दैवी आहे; या गृहीतकामुळे ते समकालीन होऊ शकत नाही. पण ते गृहीतक बदलले की त्यातील यथार्थ समकालीनता शोधता येणे शक्य आहे. जसे की 'गीता' ही मानवी कृती मानून श्री. राजीव साने यांनी 'नवपार्थहृद्गत' नावाचे लेखन केले. त्यांनी आजच्या अर्जुनाचे प्रश्न आणि आजच्या श्रीकृष्णाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.



हे ईश्वरी, दैवी लेखन असो, म्हणजे नसो !!
प्रस्तुत समकालीनतेच्या परिघाच्या चर्चेतून हे अद्भुतरम्य लेखन वगळणे योग्य राहील.

## - दोन-

"लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही' या अब्राहम लिंकनच्या 'लोकशाही' च्या व्याख्येच्या धर्तीवर "माणसांचे, माणसांसाठी माणसांनी लिहिलेले ते (आणि तेच) लेखन म्हणजे 'लेखन' ( किंवा 'लेखशाही'?! ) " अशी व्याख्या मी करू इच्छितो. लिंकनच्या व्याख्येतून लोकशाहीची मूल्ये स्पष्ट होतात. ही मूल्ये रुजणे आणि प्रत्यक्षात पाळली जाणे आवश्यक आहे, तसे लेखनाची मूल्ये स्पष्ट होणे, रुजणे आणि ती पाळली जाणे आवश्यक आहे, असे मला वाटते. ती मूल्यव्यवस्था 'लेखन' या कृती मानवी व्याख्या केली तर आणि तरच शक्य होईल, असे मला वाटते.

लोकशाहीनुसार जशी प्रत्येक व्यक्ती ही एकमेकांना समान असते, प्रत्येकाला समान संधी मिळते; तसे प्रत्येक लेखक समान असावा, विकसित होण्याची समान संधी प्रत्येक लेखकाला मिळावी, असे मला वाटते. म्हणून दैवी लेखक, अवतार, त्यांची आविष्कारणे वगळणे नितांत गरजेचे आहे. या पुरेशा पार्श्वभूमीवर मानवी लेखक येथे गृहीत धरू.

लेखक कोणीही असू शकतो. म्हणजे कोणत्याही प्रकारची स्त्री, पुरुष किंवा त्यांच्या मनोरचनेनुसार संमिश्रणाने घडलेला माणूस असतो. पेच असा की स्त्री व पुरुष त्यांना अलग (separate) करता येते, याचे भान विकसित झाले की पुढे आपण त्यात भेद (discriminate) करू लागतो. 'अलग करणे आणि 'भेद' करणे यात सामाजिक फरक आहे. तो विषमताजन्य आहे. हे अलगीकरणात भेद अपेक्षित नसतो. स्त्री-पुरुष हा भेदाचा विषय नसून फरकक्षमतायुक्ततेचा (distinguishability) आणि अलगीकरणक्षमतायुक्ततेचा (separability) प्रश्न आहे. या दोघात भेद करावयाचा नसून त्यांना केवळ अलग करावयाचे आहे. पण हे भान 'भेद' करण्याने बेभान होते.

स्त्री-पुरुषांना अलग केले तरच त्या प्रत्येकाच्या अलग दृष्टीकोनातून जगाचे आकलन करता येणे शक्य आहे. असे केलेच पाहिजे, त्यांच्या अलगतेचे दर्शन घेतले पाहिजे आणि त्याची मांडणी केली पाहिजे. हे जमले तर त्यांची दोघांची लेखक होण्याची प्रक्रिया स्वतंत्र आहे आणि त्यांचे लेखनरूपी उत्पादन स्वतंत्र आहे, त्यांच्या घडणीची होण्याची प्रक्रिया भिन्न आहे, याचे भान विकसित होते. असे केले पाहिजे तर आणि तरच 'समग्र माणूस'

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).



---

होण्याची प्रक्रिया सुरु होईल, असे मला म्हणावयाचे आहे. त्यामुळे येथे जेंव्हा मी 'माणूस' हा शब्द वापरेन, तेंव्हा ती स्त्री-पुरुष दोघांना (आणि मनोरचनेनुसारच्या संमिश्रणास) उद्देशून असेल. आणि जेंव्हा असे व्यापक समावेशन असेल तेंव्हा 'माणूस' हा केवळ रिता शब्द नसेल तर ती वरीलप्रमाणे भरीव संकल्पना असेल. असा माणूस जे काही लिहिलं त्यातून त्याचे 'होणे' साकारत जाईल.

-तीन-

'लेखक' चा लोकप्रिय अर्थ जो लेखन करतो तो. लेखन म्हणजे कथा, कविता, कादंबरी, नाटक, लेख समीक्षा इत्यादी ललित लेखन, वैचारिक लेखन. या वाङ्मयीन लेखन प्रकारानुसार लेखकाची वर्गवारी करता येईल. लेखक होण्याची मराठी परंपरा दीडदोन शतकांची आहे. हा कालावधी भारतात कुठल्याही कामाला पुरेसा आहे. आपली पाच हजार वर्षांची परंपरा तर भयंकर दणकट आहे. त्या पार्श्वभूमीवर ललित, वैचारिक इत्यादी परंपरेशी फटकून स्वतंत्र लेखक असण्याची परंपरा तुलेनेने अल्पजीवी आहे खरी; पण माणूस पाच हजार काय पण दीडदोनशेही वर्षे जगत नसल्याने; आणि एखादा दुसरा जगलाच शंभरीपर्यंत तरी अशा माणसाचे जीवन लेखनकर्म करणारे जीवन असेल असे नाही. मुळात भारतीय किंवा प्रादेशिक मराठी, कन्नड इत्यादी लेखक जगताना जरा उशीरच लेखन करू लागतात, असे मानले तर त्यांच्या जगण्याच्या आणि लेखनाच्या कालखंडाच्या तुलनेत साहित्य, लेखन इत्यादीची मराठी परंपरा दीडदोन शतकांची असणे पुरेसे आहे.

लेखक होण्याच्या प्रक्रियेत काही भौतिक मुद्दे आहेत. ते सांगून या मुद्द्यांना बाजूला करू. लेखकाने लिहिले की ते लेखन प्रसिद्धीला देणे, प्रकाशकाने ते प्रसिद्ध करणे, ते प्रकाशन वाचकापर्यंत पोहोचणे, वाचकांना लेखकाची माहिती मिळणे, त्यांनी ते पुस्तक वाचणे इत्यादी टप्पे पार पाडले की लेखक ओळखला जाऊ लागतो. हे सारे आवश्यक आहेच. पण *लिहिणे ते लेखक म्हणून ओळखले जाणे* या प्रक्रियेत आणि प्रवासात त्या माणसाचे, लेखकाचे "होणे" हा मुद्दा बाजूला पडतो. लेखकाचे 'होणे' महत्वाचे आहे आणि ते समकालीन आहे, हे मला अधोरेखित करावयाचे आहे.

-चार-

लेखकाच्या लेखनाची चर्चा सुरु झाली की परंपरेनुसार "माणूस लेखक होतो म्हणजे काय करतो ?" हा प्रश्न अपेक्षित असतो. पण एखादा माणूस लेखक होतो म्हणजे तो नेमका *काय होतो ?* हा मूलभूत प्रश्न आहे. "माणूस लेखक होतो म्हणजे नेमके *काय करतो* ?" आणि "माणूस लेखक होतो म्हणजे नेमका *काय होतो* ?" या दोन प्रश्नांत फरक आहे. *काय करतो* ? आणि *काय होतो* ? या एकाच नाण्याचे दोन बाजू आहेत, असे नाही, असे म्हणता येईल. पण ती अनिवार्यता नाही. या प्रश्नांत फरक करता येणे शक्य झाले की ते दोन प्रश्न एकमेकांपासून अलगही करता येतात, हेही लक्षात येईल.

"*काय करतो?"* हा प्रश्न माणसाच्या कृतीविषयक आहे तर "*काय होतो?*' हा माणसाच्या घडणीचा प्रश्न आहे. 'करणे' ही कृती आहे, ती बऱ्याचजणांना लागू असते. ते कार्यकर्ते होत. "आपल्याकडून निश्चित काही घडावे" असे कार्यकर्त्यांना अपेक्षित असते. पण वास्तवात त्यांना काहीतरी करत बसणे भाग पडते. त्यात काहीतरी घडते पण बरेचदा काहीतरीच घडत राहाते. बरेचजण मग काहीही करत बसतात. या गदारोळात त्यांचे 'होणे' हरवून जाते. म्हणजे 'करणे' पेक्षा 'होणे' , पर्यायाने 'होणे' अधोरेखित झाले पाहिजे, असे मला म्हणावयाचे आहे.

लेखकाच्या बाबतीत असे घडत राहाते. तो निश्चित काहीतरी लिहायला जातो आणि बरेचदा 'काहीतरीच' लिहित सुटतो. त्यातून तो जे काही घडतो, त्याला त्याचे घडणे, होणे म्हणता येत नाही.

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---



माणसाची कृती हीच त्याची घडणावळ असते, हे सांगणे पुनरावृत्तीचे मानले पाहिजे. पण जी घडण होते ती उलट दिशेने जाते का ? हा प्रश्न उद्भवतो. कृतीतून होणारी घडणावळ माणसाला 'होण्याची' संधी देते. एखादा माणूस 'निश्चित काही झाला' की तो जे काही झाला आहे त्यातून बनणारा त्याचा व्यक्तीनिष्ठ आशय किंवा आशयद्रव्य, तो माणूस प्रगट करीत जातो. त्यातून पुन्हा त्याची घडणावळ पक्की होत जाते. मग त्याच्यावर "मी असा घडलो" चा 'असा मी असामी' चा शिक्का बसतो.

माणूस कोणती कृती करतो आणि काय होतो, हे महत्वाचे ठरते. तो जे काही झालेला असतो, त्या दृष्टीने जगाकडे, वास्तवाकडे पाहातो आणि तेच त्याच्या लेखणीतून उतरते. त्यातून तो लेखक घडतो. त्याचे हे अमुक अमुक असणे हे त्याचे होणे असते; हे 'झालेले' घटीत त्याचे मूळ आशयद्रव्य रचत जाते.

आता, लेखक होण्याची आणखी एक बाजू पाहू. ती वाचकाच्या बाजूने येणारी आहे.

लेखन वाचतात ते वाचक. त्यांचे सुद्धा घडणे, होणे असते. म्हणून वाचकांचे "होणे" पाहू. लेखन वाचणारे वाचक काय "होतील" ?

वाचकातून सामान्य वाचक आणि समीक्षक, परीक्षक, चिकित्सक इत्यादी विशेष वाचक घडत जातात. हे घडणे म्हणजे त्यांचे *होणे* असते. सामान्य वाचक वाचतो. त्याला लेखन आवडते, नावडते किंवा अन्य काही वाटते. नाटकाच्या भाषेत तो रसिक असून रसास्वाद घेतो, एवढेच. हे सामान्य वाचकाचे 'रसिक होणे' असते.

विशेष वाचकाला त्यापेक्षा जास्त काही वाटून तो ते लिहितो. त्यातून नवा लेखक घडतो. ही लेखक होण्याची दुसरी पातळी. समीक्षक, परीक्षक, परिचयक हे लेखकाचे प्रकार त्यातून उद्भवतात. हा आवडीचा आणि ऐच्छिक निवडीचा प्रांत आहे. प्रत्येक वाचक लेखक होईल असे नाही. लेखन करून उत्क्रांत झालेला लेखक आणि वाचकातून उत्क्रांत होणारा वाचक हे परस्परावलंबी असू शकतात. चांगला लेखक हा चांगला वाचकही असतोच.

माणसाप्रमाणे देवावर, दैवावरही लेखक असण्याचे आरोपण असते. देव, ईश्वर हाच कपाळावरील भाग्यलेखक आहे, अशी समजूत असते. किंवा गेलाबाजार 'निसर्गाचे पुस्तक गणिताच्या भाषेत लिहिले आहे' असे लिहिले की हे निसर्गपुस्तक लिहिणारा तो ईश्वर असा समज होतो; ते वाचणारे वाचक गणिती होतात. भाग्यलेख, ललाट रेखा वाचणारे ज्योतिषी निर्माण होतात. वेदवाङ्मय ही दैवी किंवा ईश्वरी कृती मानल्यामुळे ती समकालीन नाही.

तेंव्हा आता, उरलेल्या लेखनातून व लेखकातून समकालीनतेचा परिघ निश्चित केला की समकालीन लेखकाचा परिघ आणि लेखकाचा समकालीन परिघ, असे दोन्ही परिघ अधोरेखित करता येतील.

-पाच-

वेद किंवा प्लेटो व त्यांचे अनुयायी आपणास *चिरंतन काळ* ही संकल्पना देतात. ती प्रस्तुत 'समकालीन' च्या आणि सामाजिक विकासाचा, साहित्याचा परिघ विस्तारीत होण्यात अडथळा आहे, दिशाभूल करणारी आहे. आपल्याला उपयुक्त आहे तो सामाजिक दृष्टीने मोजता येणारा काल. त्यास आपण 'सामाजिक काल' म्हणू.

सामाजिक काल म्हणजे व्यक्ती व समाज ज्या काळात वास्तवात जगत असतात तो काल. या कालखंडात जी मुख्यतः राजकीय व सामाजिक व्यवस्था असते, तिचा ते भाग असतात. ती व्यवस्था त्यांच्या

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---

सद्यकालीन जीवनाची चौकट असते. या चौकटीतील बांधेसूद काल हा सामाजिक काल होय, असे मी समजतो. या कालात असणे, त्या कालानुरूप आपल्या विचारविश्वाची मांडणी करणे म्हणजे समकालीन असणे.

"समकालीन' याचा अर्थ प्रत्येकाने आपल्या अस्तित्वात असण्याच्या कालखंडात त्या कालखंडातील विचारविश्वाशी वैचारिकदृष्ट्या, तात्त्विकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या नाते राखून असणे." आता, या नात्याचे स्वरूप काय असेल ? हे नाते काळाशी, स्थळाशी – भौगोलिक रचनेशी, सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक, तात्त्विक, वैज्ञानिक विकास, संबंधित चळवळी, ज्ञानरचना, मूल्यव्यवस्था इत्यादींशी नाते राखतो, त्यास 'समकालीन' म्हणता येईल. याचे काही टप्पे सांगता येतील :



*आपण आपल्याच काळात जगत आहोत,* भूतकाळात नाही आणि दिलेल्या विद्यमान काळाच्या चौकटीत राहून भविष्याची आखणी करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत, याचे भान स्वतःमध्ये विकसित करणे, यास 'समकालीनत्वाची जाणिव' म्हणता येईल.

ही 'समकालीनत्वाची जाणिव' माझ्यात कोणत्या काळात जागेल ? माझा समकाल कोणता ? तर मी ज्या देशात राहातो त्या देशाचा विद्यमान कालखंड. स्थल आणि काल यांच्या अनुभवाच्या चौकटीत मी माझा समकाल निश्चित केला पाहिजे. "मी सध्या एकविसाव्या शतकात भारतात लोकशाही समाजवादी इहवादी देशात राहातो आहे, या समाजव्यवस्थेची मूल्यव्यवस्था स्वातंत्र्य, समता, बंधुता, समृद्धी या मूल्यांनी बनलेली आहे; ती वर्ण-जाति-लिंगभेद न मानणारी, कोणत्याही प्रकारचे शोषण न करणारी आहे आणि मला ती बंधनकारक आहे" हे स्वीकारणारा काल हा 'माझा काल' आहे, हे माझ्या काळाचे स्वरूप आहे.

इथे माझी जन्मतारीख ते माझी वैचारिक व मानसिक मूल्यव्यवस्था घडविणारी समाजव्यवस्था यांच्या उगम मला गृहीत धरला पाहिजे. यात गतकालाचा समावेश होत आहेच, शिवाय विद्यमान काल आणि मी अस्तित्वात असेतोपर्यंतच्या काळाचाही समावेश होत आहे. माझा जन्मकाल हा भूतकाल आणि मी अस्तित्वात असण्याचा काल हा विद्यमान काल आणि मी कधीपर्यंत असेन ते अज्ञात असल्याने तो जो काही काल असेल तो भविष्यकाळ.

वेगळ्या परिभाषेत, ज्येष्ठ लेखक सतीश तांबे यांच्या भाषेत, "समकालीनामध्ये काही गोष्टी गतकालीन म्हणजे पारंपरिक, तर काही काळाच्या पुढच्या, तर काही सार्वकालिक/त्रिकालाबाधित अशा असतात. थोडक्यात समकालीनांमध्ये सर्व काळांतील गोष्टींची सरमिसळ असते. त्यामुळे निखळ 'समकालीन' म्हणजे नव्यानं अवतरलेलं आणि रुळलेलं जे काही असेल ते ! घटित समकालीन तर जाणीवही समकालीन असते. (सतीश तांबे, 'समकालीन : एक मुलाखत'- संवाद, *संकल्पनेसंदर्भात,* "ऐसी अक्षरे", दिवाळी अंक २०१५)

माझ्यात 'समकालीनत्वाची जाणिव' आहे, मी 'समकालीन' आहे एवढे म्हणून चालणार नाही तर मी ते सिद्धही केले पाहिजे. ती माझी सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठी त्या भानाचे स्वतःला शक्य असलेले सर्व पुरावे व्यावसायिक भूमिकेतून देणे. म्हणजे मी भारतीय लोकशाही मानतो, वर्ण-जाति-लिंगभेद मानीत नाही, हे मी माझ्या कृतीतून दिले पाहिजे. माझा सर्व आविष्कार माझ्या काळाच्या मूल्यव्यवस्थेशी इमान राखणारे आहे, हे मी सप्रमाण दाखवून दिले पाहिजे.

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---



पुढे, पुरावे देणे, अनुषंगिक कृती करणे याचा अर्थ माझ्यातील हे भान मी इतरांमध्ये जागविणे. म्हणजे मी समकालाचे समाजभान जागविणे. केवळ मीच माझ्या आत्मभानात मग्न राहाणे पुरेसे नाही, तर माझ्याबरोबर माझे सांगाती म्हणून मला इतरांनाही मी सोबत घेतले पाहिजे. माझी 'समकालीनत्वाची जाणिव' मी त्यांच्यात पोहोचविली पाहिजे. ही माझी नैतिक भूमिका असेल. ही माझी 'समकालीनत्वाची जाणिव' इतरांमध्ये प्रवाहीत करण्यासाठी त्या सह-जनांना समजेल अशा भाषेत मी ती संवादी करणे. याचा अर्थ असा की, या इतरांना त्यांच्या काळाचे भान येईल, असे सर्व प्रयत्न करणे. इथे 'त्यांच्या काळाचे' याचा अर्थ 'मी आणि ते' एकाच काळात आहोत, याची जाणीव त्यांच्यात निर्माण करणे. म्हणजेच त्यांनाही समकालीन बनविणे. 'मी' आणि 'ते' मिळून "आपण" बनत असल्यामुळे "आपल्या सर्वांच्या काळाचे आपल्या सर्वांना भान येईल" , असे सर्व प्रयत्न मी स्वतः करणे. पुढे त्यांनाही इतरांसाठी संवादी व आशयसमृद्ध बनविणे, त्यांची तशी तयारी करवून घेणे. असे नेहमी करीत राहणे. या प्रयत्नांना 'संवादाची रित ' म्हणून प्रस्थापित करणे. ही रित प्रभावीपणे वापरणे, हे ओघाने येतेच.

कालांतराने हा समकालीनांचा प्रवाह मोठा बनेल. आपला सर्वांचा दर्जा समान होईल. अस्सल ज्ञानात्मक समता प्रस्थापित होईल. सारेजण समकालीन बनतील. मग, "मी, प्रथम पुरुषी जे काही निर्माण करेन, जी काही माझी अभिव्यक्ती असेल, माझे व्यक्त होण्याचे माध्यम असेल ते सारे लेखन,कला, संगीत, नाट्य इत्यादी इतर समकालीनांच्या आकलनाच्या कक्षेत येईल. असे अन्य अभिव्यक्तीच्याही बाबतीत घडेल.

काळाशी मी संवादी असणे, इतरांना संवादात सहभागी करून घेणे, सर्वचजण संवादाच्या एकाच पातळीवर येणे ही 'समकालीनत्वाची जाणिव' पक्क होण्याची अवस्था असेल. या प्रकारे 'समकालीनत्वाची जाणिव' ही सामाजिक घटना आहे, व्यक्तिगत नाही. तिची सुरुवात व्यक्तिगत राहील पण अंतिम परिणती सामाजिक असेल.

सामाजिक काळाच्या संदर्भातच आपण' समकालीन 'ही संकल्पना मांडू शकतो .लेखकाचे' असणे 'आणि त्याचे' होणे 'हे या अर्थाने समकालीन असले पाहिजे .लेखक समकालीन होणे हेच त्याच्या' असण्याचे स्वरूप ' मानले पाहिजे. लेखकाचे 'होणे' म्हणजे समकालीन होणे असते. हा अंतर्गत विरोधाभास वाटला तरी समकालीन असण्याच्या संकल्पनेचे ते स्वरूप आहे. म्हणजे कसे, तर आज समजा कुणी एक लेखक समकालीन आहे. पण उद्याचा आणखी शंभर-दोनशे वर्षांनंतरचा लेखक कसा असेल ? जर त्याने त्याच्या काळाशी-स्थळाशी सुसंगत लेखन केले तरच तो त्याच्या काळातील 'समकालीन' ठरेल. त्याने आपला, म्हणजे एकविसाव्या शतकाचेच विषय लिहिले तर 'समकालीन' ठरणार नाही. असे पुढील प्रत्येक काळातील लेखकाच्या बाबतीत म्हणता येईल.

याचा अर्थ समकालीन लेखनाचा मुख्य संदर्भ लेखकाचा सामाजिक काल हा असतो. त्यावर आधारलेला भविष्यकाळ हा भविष्यकालीन प्रगत संदर्भ असतो. या अर्थाने समकाल व समकालीन लेखन, ते करणारा लेखक हे सारे समकालीन असतात.

इथे लेखकाचे' असणे 'आणि त्याचे' होणे 'महत्वाचे ठरते. "माणूस लेखक होतो म्हणजे नेमके काय करतो ?" आणि "माणूस लेखक होतो म्हणजे नेमका काय होतो ?" या प्रश्नांचा आंतरसंबंध काय ? तर लेखक लेखन करतो आणि समकालीन लेखक समकालाची जाणीव व्यक्त करतो. ती व्यक्त होत असेल तर आणि तरच तो स्वतः समकालीन होतो.

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---



आता, "माणूस लेखक होतो म्हणजे नेमके *काय करतो* ?" आणि "माणूस लेखक होतो म्हणजे नेमका *काय होतो* ?" या दोन प्रश्नांत फरक आहे, त्याचा अर्थ काय ? तर , -

एखादा लेखक लेखन करतो पण ते सारे गतकालीन मूल्यव्यवस्था सांगणारे, गतकालीचा पुरस्कार करणारे असेल तर तो लेखक भौतिकदृष्ट्या असतो विद्यमान काळात पण मानसिकदृष्ट्या जातो भूतकाळात. परिणामी त्याच्या त्या आज विद्यमानकाळात खेचून आणलेल्या गतकाळात तो जगतो पण समकालीन नसतो. उदाहरणार्थ जातीव्यवस्थेचे समर्थन करणारे लेखन हे गतकालीन लेखन असेल तर लेखक विद्यमान समकालीन असेल. परिणामी 'लेखन गतकालीन आणि लेखक आधुनिक' हे चमत्कारिक चित्र समोर येईल. असे लेखक अत्यंत सुखात समाधानात जगत आहेत! असे दिसेल. आणि समकालीन लेखन करणारे समकालीन लेखक दुःखी असू शकतात. सुखी डुक्कर आणि असमाधानी सॉक्रेटीस ! असा लेखक समकालीन असतो पण त्याचे लेखन समकालीन नसते. म्हणून लेखक *काय करतो* ? आणि लेखक *काय होतो* ? या एकाच नाण्याचे दोन बाजू आहेत, असे म्हणता येत नाही. या दोन प्रश्नांत या कारणासाठीच फरक करणे आवश्यक आहे.

पण समजा, असाच एखादा लेखक आहे की जो या साऱ्या विरोधाभासाचेच चित्र तुमच्यासमोर मांडतो आहे तो नीट, पक्का समकालीन आहे.

माणसाच्या *असण्याचा* संदर्भ वर्तमानकाळाशी निगडीत आहे तर *होण्याचा* संदर्भ भविष्यकाळाशी आहे. त्या त्या काळाच्या तुकड्यात भविष्यकाळ अनुभवला की तो आधी वर्तमानकाळ होतो आणि नंतर भूतकाळ होतो. माणूस वर्तमानात राहून मानसिकदृष्ट्या भूतकाळाशीच जोडला गेला की तो वर्तमानाशी आणि पर्यायाने भविष्याशी जोडला जात नाही. भविष्य टप्प्यात धरून वर्तमानाशी तो इमान राखत असेल तर आणि तरच त्याला समकालीन म्हणता येईल. 'समकालीन' मध्ये नजीकचा भूतकाळ, नजीकचा भविष्यकाळ आणि अर्थातच विद्यमान कालखंड यांचा समावेश आवश्यक आहे. समकालीन असण्याचा संदर्भ नेहमी विद्यमानकाळाशी नाते सांगतो.

-सहा-

भारतात जन्म, पुनर्जन्म, आत्मा, कर्मसिद्धान्त, पापपुण्य, स्वर्ग-नरक या संकल्पना सामान्य लोकांच्या जीवनाचा भाग बनल्या. गांधींपर्यंत अनेकांनी वेदान्त, गीता, इत्यादी संतवचने प्रमाण मानल्याने या साऱ्या संकल्पना म्हणजे 'समकालीन' त्वाला मोठी बाधा ठरल्या. त्याचा पुरावा म्हणजे भारतीय माणूस एकाच कालखंडात वेगवेगळे जीवन जगत असतो. ज्येष्ठ लेखक सतीश तांबे यांच्या मते समकालीन हे त्या त्या समाजाच्या भूगोलाबरोबर आणि त्या त्या समाजातल्या आर्थिक आणि सामाजिक विभागण्यांबरोबर बघायला पाहिजे. एका काळामध्ये जगत असणाऱ्या निरनिराळ्या सामाजिक आणि आर्थिक अवकाशांतल्या, निरनिराळ्या राजकीय अवकाशांतल्या लोकांच्या धारणा आणि समजुती या वेगवेगळ्या असणार. विशेषतः भारतासारख्या देशामध्ये ज्या ठिकाणी अनेक काळामध्ये समाज एकत्रित जगतो आहे - आदिवासींपासून ते आत्ता आधुनिकोत्तर काळापर्यंत; त्यात एकमेव अशी जाणीव आहे असं म्हणण्याला काही अर्थच नाही. त्याप्रमाणे अमेरिका, भारत, इंग्लंड, जपान आणि सीरियामधले पोस्टमॉडर्न हेही काही समकालीन किंवा एका जाणीवेचे असं म्हणण्याला अर्थ नाही.( सतीश तांबे, 'समकालीन : एक मुलाखत'- संवाद, *संकल्पनेसंदर्भात,* "ऐसी अक्षरे", दिवाळी अंक २०१५)

श्रीनिवास हेमाडे, *परिघ : लेखकाचा आणि समकालीनतेचा,* "प्रतिष्ठान", मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, अंक काल : सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५, वर्ष : ६४ वे, अंक : पहिला, पाने २३ ते ३०; कार्यकारी संपादक : आसाराम लोमटे (९४२२१९२१९३) संभाजीनगर, परभणी ४३१ ४०१; प्रकाशक : डॉ. दादा गोरे; अक्षरजुळणी : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि पुणे (अंक प्रसिद्धीचा प्रत्यक्ष काल : मे २०१६ ).

---

"एखादा विशिष्ट प्रांत, समूह, अवकाश हे उरलेल्या अवकाशापासून आणि समजुतींपासून आणि धारणांपासून वेगळे असणार; आत्ताही आहेत. अशा विविध धारणा आहेत याची जाणीव ज्याला आहे तो आत्ताचा समकालीन आहे. परंतु उघडपणे सगळे असे असणार नाहीत, कारण मग वेगवेगळया धारणा उरणार नाहीत. ही एक कॅच ट्वेंटी टू सिच्युएशन आहे", असे मत प्रसिद्ध लेखक मकरंद साठे व्यक्त करतात. ( मकरंद साठे : 'समकालीन : एक मुलाखत' - संवाद, *संकल्पनेसंदर्भात*, "ऐसी अक्षरे", दिवाळी अंक २०१५)



इथे एक माझ्या मते, वेगळाच पेच आहे. तो असा की, विद्यमान विषम स्थिती आणि त्यातील माणसे, घटना यांना लेखांचे, लेखनाचे आशयद्रव्य म्हणून वापरायचे की ती स्थिती बदलायची ? हा नैतिक निवडीचा भाग आहे. म्हणजे असे की मला जर इतरांना समकालीन बनवायचे असेल, त्यांना माझ्याशी सुसंवादी करावयाचे असेल तर त्यांना त्यांच्या आहेत त्या स्थितीशील वास्तवातून बाहेर काढले पाहिजे. पण मग, माझे लेखनाचे आशयद्रव्य हरपेल. जर आशयद्रव्य टिकवायचे असेल तर ते समकालीन होणार नाहीत, मी एकटाच समकालीन राहील. त्यावेळी मला रसिक, वाचक, परीक्षक लाभणार नाहीत. मी जर आशयद्रव्य आहे तसेच टिकवून मीच एकटा समकालीन बनलो तर ते क्रूर होईल ! मग 'समकालीनतेचा प्रवाह' गतिमान राहणार नाही. सामाजिक सुधारणा होणार नाही.

याचा अर्थ असा की, मी माझा समकालीन राहणार नाही. कारण मी समकालातील मूल्यव्यवस्था अमलात आणीत नाही ! ती आणायची तर 'मी वैचारिकदृष्ट्या समकालीन असणे' ही सर्वांचा सहभाग असणारी सामाजिक व्यवस्था मला प्रवाहित करणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे.

-सात-

लेखक कुणाला म्हणावे ? या विषयी सर्व संस्कृतींमध्ये आणि सर्व भाषांमध्ये दांडगे वाद आणि विस्तीर्ण सवतेसुभे आहेत. ज्याचे किमान एक (तरी) पुस्तक प्रकाशित झाले आहे, तो लेखक की 'एक +' पुस्तके प्रकाशित झाली आहेत तो लेखक?! यावरून ही 'बा' चा' 'बा' ची (प्रताधिकार – पु. ल. देशपांडे) होते. 'किमान एक पुस्तक' या निकषावर, ज्याचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही पण लाखो वाचकांपर्यंत पोहोचला आहे; असा वृत्तपत्राचा स्तंभलेखक 'लेखक' असतोच असे नाही. उलट 'किमान वाङ्मयीन दर्जा' असे बारसे करता येण्याचे धाडस करण्याचा विचारही, ज्या पुस्तकाच्या संदर्भात मनात येऊ शकत नाही, त्या पुस्तकाचा लेखक हा 'लेखक' मानला जातो. कारण त्याचे पुस्तक अस्तिवात आलेले असते. बाजारात ते उपलब्ध नसले तरी त्या लेखकाकडे असतेच. त्यात त्याला एखादा पुरस्कार मिळाला की कायम शिक्कामोर्तब.

लेखक आणि विचारवंत यातही एक पेच आहे. एखादा विचारवंत आहे पण एकही पुस्तक त्याने लिहिलेले नाही, मग तो लेखक आहे का ? तर नाही. जसे की राम बापट किंवा मे. पुं. रेगे यांनी एकही स्वतंत्र पुस्तक लिहिलेले नाही. त्यांनी लेखन यथेच्छ केले, मूलगामी चिंतनही केले; ते विचारवंत म्हणून मान्यही आहेत, पण ते लेखक मानले जातात असे आढळत नाही.

बरे, जो लेखक आहे तो विचारवंत आहे किंवा असतोच असेही नाही. कथालेखक, कादंबरीलेखक हे काही विचारवंत असतील, असे व्यंजित होत नाही. लेखक आणि विचारवंत ही पदे आणि व्यक्ती परस्परविरोधी नाहीत पण परस्परव्यावर्तकही नाहीत. उघडच सांगायचे तर अनेक भरताड लेखकही बाजारात मौजूद आहेत, असतात. मग तिसरी वर्गवारी उद्भवते: विचारवंत लेखक.

हा लेखकाचा तिसरा प्रकार म्हणजे लेखन आणि विचार यांची उत्क्रांती मानली पाहिजे. व्यापक सामाजिक भान आणि जबाबदारी यांचे उत्तरदायित्व यांच्याकडे जाते. समकालीन असणे हे या प्रकारच्या लेखकाचे अंगभूत लक्षण असते, असे म्हणता येते.

वसाहतवाद, नववसाहतवाद, आधुनिकता, आधुनिकतावाद किंवा उत्तरआधुनिकता इत्यादी मुद्दे मी आता इथे आणीत नाही. समकाल ही संकल्पना रचताना हे घटक आवश्यक आहेत खरे, पण ते किती मागे न्यावयाचे आणि किती पुढे तणावायचे याची सविस्तर चर्चा आवश्यक आहे, एवढे नमूद करतो. नववसाहतवादाशी जोडली गेलेली खासगीकरण,जागतिकीकरण, उदारीकरण हेही मुद्दे तूर्तास बाजूला ठेवू. त्याचप्रमाणे भविष्यकालीन, विशिष्टकालीन, सर्वकालीन इत्यादी संकल्पनाही या चर्चाविश्वात आता आणणे उचित ठरणार नाही.

-आठ-

आता, एक नाजूक प्रश्न उपस्थित करू.

"समकालीन असणे" ही केवळ लेखकाची जबाबदारी आहे का ? की प्रकाशक, संपादक, समीक्षक आणि वाचक यांचीही आहे ? किंबहुना 'त्यांचीही' आहे की नाही?

लेखकाने कितीही समकालीन लिहिले अन प्रकाशकाने ते प्रसिद्ध केलेच नाही; किंवा लेखन प्रसिद्ध झालेच पण वाचकांनी वाचलेच नाही; समजा वाचलेच पण समीक्षकांनी दखल घेतलीच नाही; तर काय ?

'समकालीन असणे' ही नीति केवळ लेखकांनी पाळावयाची जबाबदारी आहे आणि प्रकाशकांनी केवळ धंदा केला तर 'समाज समकालीन होणे' कसे घडेल ?!

बर, समजा "लेखकाने केवळ लिहावे, त्याने समाज बदलण्याची गरज नाही, ते त्याचे कामच नाही" अशी भूमिका एखाद्याने घेतली तर ?...

मग... कशाला काय अर्थ उरतो ?

ही मांडणी कोणत्याही काळात लागू पडेल, ही तिची शक्ति आहे. तिचे ते स्वरूप आहे. या मांडणीत आणखी सुधारणा करता येतील, याची मला जाणीव आहे. मी ही केवळ प्रस्तावना करीत आहे. ही मांडणी खुली आहे.

श्रीनिवास हेमाडे
लेखक, मुक्त पत्रकार, भाषांतरकार.
'सम्यक' ११, नवरंग बाग,हॉटेल सम्राट समोर, संगमनेर – नाशिक महामार्ग,
संगमनेर ४२२ ६०५ जिल्हा : अहमदनगर
shriniwas.sh@gmail.com, http://shriniwashemade.yolasite.com/